# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## (स्वायत्त महाविद्यालय)

# राष्ट्रीय सेवा योजना

## नियमित कार्यक्रमाचा अहवाल व लेखे

# 2020-21

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

## राष्ट्रीय सेवा योजना

# २०२०-२१

# नियमित कार्यक्रमाचा अहवाल
# व
# जमा खर्च

**कार्यक्रमाधिकारी**

डॉ.के.डी.सावंत

डॉ.पी.जी.त्रिमुखे

डॉ. एस.व्ही. पाटील

**प्राचार्य**

डॉ.एम.एच.गव्हाणे

D:\2021-22 (PC-3)\NSS\Ahwal 2020-21(2)

# राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त) लातूर
## राष्ट्रीय सेवा योजना
## वार्षिक अहवाल २०२०-२१

विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास करण्यासाठी व त्यांच्यात श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक कार्याची जाणिव निर्माण करुन त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग सतत कार्यशील असतो.शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील स्तरावर १०० व वरिष्ठ महाविद्यालयातील स्तरावर २५० विद्यार्थी स्वयंसेवकांची संख्या मंजुर करण्यात आली या विभागाच्या वतीने वर्षभरात रासेयो कार्यक्रमाधिकारी व विद्यार्थी स्वयंसेवकाकडून विविध उपक्रम राबविण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०१९ -२० मध्ये रा.से. यो. ची स्थानिक समन्वय समितीची बैठक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली बैठकित विविध विषयावर सखोल चर्चा करुन कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला. सदर शैक्षणिक वर्षात रा. से. यो अंतर्गत विविध उपक्रम /कार्यक्रम राबविण्यात आलेत ते सविस्तर पणे पुढे नमुद करण्यात आले आहेत.

**१) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती:**

दि. १४ एप्रिल २०२० रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरा करण्यात आली. या वेळी कोरोना व्हायरसची वैश्वीक महामारी लक्षात घेता गर्दी न करता छोटेखाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन त्यांना महाविद्यालयात अभिवादन करण्यात आले. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य,उपप्राचार्य, रासेयो कार्यक्रमाधिकारी व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**२) कोरोना व्हायरस जनजागृती अभियान व तपासणी कार्यक्रम :**

राजर्षी शाहू महाविद्यालयातील हेल्थ सेंटर व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यामाने कोरोना व्हायरस या वैश्विक महामारीला रोखण्यासाठी व यांचा संसर्ग वाढू नये म्हणून दिनांक १७ जून २०२० पासुन महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची मोफत आरोग्य तपासनी करण्यात आली. हि तपासणी १७ जुन २०२० पासुन ३० सप्टेबर २०२० पर्यत व शैक्षणिक वर्ष २०२१ पर्यंत नित्य नियमाने करण्यात आली सदर जनजागृती अभियानाअंतर्गत वर्षभर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ऐ.जे. राजू, उपप्राचार्य, डॉ. सदाशिव शिंदे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. के. डी. सावंत, डॉ. संभाजी पाटील डॉ. पुष्पलता त्रिमुखे

प्रा. विजय गवळी प्रा. सोमदेव शिंदे हेल्थ सेंन्टरच्या प्रमुख डॉ. स्वाती फेरे डॉ. ओमप्रकाश शहापूरकर प्लेसमेंट ऑफिसर राहुल आठवले व इतर प्राध्यापक शिक्षक आणि सेवक श्री गोंविद जाधव, श्री चंद्रकांत तिडके  श्री स्वामी रामलिंग व इतर कर्मचारी यांनी यासाठी विशेष परिश्रम घेतले.

**३) जागतिक योग दिनानिमित्त महाविद्यालयाच्या वतीने ऑनलाईन योग शिबीर संपन्न:**

दि. २१ जून २०२० रोजी राजर्षी शाहु महाविद्यालयाच्या वतीने 'आंतरराष्ट्रीय योग दिवसानिमित्त' ऑनलाईन योग शिबीराचे आयोजन करण्यात आले. या योग शिबीरात पतंजली योग समितीचे योग प्रशिक्षक प्रा. शाहुराजे औताडे, सौ. भारती औताडे यांनी महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी स्वयंसेवकांना ऑनलाईन योगासन व प्राणायमाचे प्रकार शिकवले या ऑनलाईन योग शिबीरात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ऐ.जे. राजू रासेंयो चे कार्यक्रमाधिकारी डॉ. के डी. सावंत डॉ. संभाजी पाटील डॉ. पुष्पलता त्रिमुखे प्रा. विजय गवळी प्रा. सोमदेव शिंदे व महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सक्रीय सहभाग नोंदवला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी यावेळी ऑनलाईन कार्यक्रमात उपस्थित असणाऱ्या प्राध्यापकांना आपले आरोग्य सुदृढ ठेवण्याचे संदेश दिले. कार्यक्रमाचे प्रास्तावीक व संचलन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. सोमदेव शिंदे यांनी केले.

**सहभागी कर्मचारी एकूण २१०    पुरुष : १५५  महिला : ५५**

**४) बाळ गंगाधर टिळक स्मृतिशताब्दी ऑनलाईन कार्यक्रमात रा. से.यो. कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेवकाचा सहभाग:**

दिनांक १ ऑगस्ट २०२० रोजी उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र मुंबई विद्यापीठ मुंबई व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे यांच्या संयुक्त विद्यामाने https://youtube.be/EpQ2y3SwFs या ऑनलाईन लिंकवर आयोजित कार्यक्रमात आमच्या रासेयो विभागाच्या विद्यार्थ्यांनी वकार्यक्रमाधिकाऱ्यांनी सहभाग नोंदवला. **सहभागी कर्मचारी एकूण १८५    पुरुष : १४२  महिला : ४३**

**५) ऑनलाईन अवयदान जनजागृती कार्यक्रमात सहभाग:**

दिनांक १३ ऑगस्ट २०२० रोजी मुंबई विद्यापीठ मुंबई व राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थ्यी विकास विभागाद्वारे सकाळी ११.०० वाजता अवयवदान जनजागृती कार्यक्रम https:// www.youtube. com/channel /UCEHmEa3CDTRxc70JzmN_VA या लिंकवर ऑनलाईन आयोजित करण्यात आला या कार्यक्रमात राजर्षी शाहु महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यी स्वयंसेवकांनी व कार्यक्रमाधिकारी यांनी सहभाग नोंदवला.

**सहभागी विद्यार्थी एकूण २०५    मुले : १०३    मुली : १०२**

**६)	शाहू महाविद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण कार्यक्रम**

दिनांक १५ ऑगस्ट २०२० रोजी भारतीय स्वातंत्र्य दिनांनिमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयात सकाळी ८.०० वाजता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांच्या शुभ हास्ते महाविद्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. त्यावेळी कोरोना विषाणूच्या संसर्गाची पर्श्वभूमी विचारात घेता ऑनलाईन कार्यक्रमाचे प्रक्षेपण करण्यात आले. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रासेयो चे कार्यक्रमाधीकारी ऑनलाईन उपस्थित होते.

**७)	राज्यस्तरीय ऑनलाईन वक्तृत्त्व स्पर्धा:**

सोमवार दिनांक १७ ऑगस्ट २०२० रोजी ७४ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त  स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि राजर्षी शाहू महाविद्यालय स्वायत्त लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यामाने राज्यस्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाली या स्पर्धेचे उदघाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष व शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळरावजी पाटील यांनी मार्गदर्शनाव्दारे केले. या वक्तृत्व स्पर्धेसठी प्रमुख्र पाहुणे म्हणुन स्वा.रा. ती. म. विद्यापीठ नांदेड चे रा. से. यो. संचालक डॉ. शिवराज बोकडे व रा.से यो चे लातूर चे जिल्हा समन्वयक डॉ. संतोष पाटील उपस्थित होते. या स्पर्धेचे परीक्षण डॉ. विशाल करपे नंदूरबार व डॉ. बाळासाहेब शिंदे औरंगाबाद यांनी केले.

या राज्यस्तरीय स्पर्धेला यशस्वी रित्या संपन्न करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए. जे. राजू राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. के. डी. सावंत, डॉ. संभाजी पाटील, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे यांनी विशेष प्रयत्न केले.

**सहभागी विद्यार्थी एकूण ९६	मुले : ४४ मुली : ५२**

**८)	अंतरराष्ट्रीय युवा दिनानिमित्त आयोजित चित्रकला /पोष्टर स्पर्धेत शाहूच्या विद्यार्थी स्वयंसेवकाचा सहभाग:**

दि. २८ ते ३० ऑगस्ट २०२० दरम्यान शासकीय स्त्री रुग्नालय, शाहू चौक लातूर, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण पथक, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय, लातूर व्दारा १२ ऑगस्ट या जागतिक युवा दिनाचे औचित्य साधुन H I V व कोरोना व्हायरस या वैश्विक महामारी बददल जनजागृती मोहिम अभियानासाठी ऑनलाईन चित्रकला / पोष्टर स्पर्धा घेण्यात आली या स्पर्धेत राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी श्री विजय गवळी यांनी ही स्पर्धेसाठी सहकार्य केले रासेयोच्या स्वयंसेवकांनी सक्रीय सहभाग घेतला या ऑनलाईन पोष्टर प्रझेटेशन स्पर्धेत राजर्षी शाहू महाविद्यालयातील रा.से यो. स्वयंसेवक शेख्र सोहेल अय्युब प्रथम तर अमित दत्ता गिरी व कु. वैष्णवी नारायण कदम हे क्रमश: द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त केले

स्पर्धकांना संबंधीत विभागाव्दारे ई. प्रमाणपत्र देण्यात आले.

**९) मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन व स्वा.रा.ती.म. विद्यापीठ वर्धापन दिन साजरा**

दिनांक १७ सप्टेंबर २०२० रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात मराठवाडा मुक्तीसंग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थी मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे वर्धापण दिनानिमित्त उपप्राचार्य डॉ. ए.जे राजू यांच्या शुभ हस्ते व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न झाला. कोरोना विषाणूचा संसर्गाची पार्श्वभूमी विचारात घेता महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, रा. से. यो. चे कार्यक्रमाधिकारी ऑनलाईन उपस्थित होते.

**१०) रा.से. यो. चा वर्धापण दिन साजरा**

दिनांक २४ सप्टेंबर २०२० रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने एन. एस. एस. वर्धापण दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला.कोरोना विषाणूचा संसर्गाची पार्श्वभूमी विचारात घेता शारीरिक अंतर ठेवत संपूर्ण सुरक्षेची काळजी घेत छोटया स्वरुपात या कार्यक्रमात महात्मागांधी, संत गाडगेबाबा, पंडितजवाहरलाल नेहरु यांच्या प्रतिमांचे पुजन करुन पुष्पहार अपर्ण करण्यात आले.विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकास घडविण्यासाठी रा.से. यो. विभाग सतत कशा पध्दतीने कार्यरत असतो, एन.एस.एस. चे स्वरुप, उद्दिष्टे व वैयक्तिक आणि सामाजिक फायदे कोणती ? या बाबत राष्ट्रीय सेवायोजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी यांनी माहिती सांगीतली. या वेळी रा.से. यो. चे कार्यक्रमाधिकारी डॉ. संभाजी पाटील, प्रा. सोमदेव शिंदे, शिवराज काचे, प्रा. बापूसाहेब जवळेकर सेवक श्री जयप्रकाश गोणे, विद्यार्थी स्वयंमसेवक शिवानंद बुके व इतर शारीरिक अंतर ठेऊन उपस्थित होते.

**सहभागी विद्यार्थी एकूण ३४ मुले : १२ मुली : २२**

**११) नवनियुक्त उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे यांचे रासेयो विभागाच्या वतीने स्वागतः**

राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या उपप्राचार्य पदी प्रा. सदाशिव शिंदे यांची नवनियुक्ती झाल्यामुळे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे दि. २५ सप्टेंबर २०२० रोजी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए.जे. राजू व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. संभाजी पाटील, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. राजेंद्रप्रसाद शास्त्री, रासेयो विद्यार्थी स्वयंसेवक कु. मोरे प्रतिक्षा व इतर उपस्थित होते.

**१२) डॉ. गोपाळरावजी पाटील यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त मध्यवर्ती बसस्थानकांतवृक्षारोपणः**

दि. ०३ आक्टोबर २०२० रोजी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व मा. खा. आदरणीय

डॉ. गोपाळरावजी पाटील यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने लातूर शहर मध्यवर्ती बसस्थानकात ऑक्सिजन पार्कची निर्मिती आणि वृक्षारोपण करण्यात आले.

वड, पिंपळ, बकुळ, लिंब, नांदुर्की या सारखी वृक्षाची ५ ते ६ फुटी वृक्ष रोपे लावण्यात आली वृक्षारोपणावेळी आगार व्यवस्थापक श्री. कुरेशी मोहम्मद जफर, बसस्थानक प्रमुख श्री. हनुमंत चपटे, शाहु महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ऐ.जे . राजू, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे रा.से यो. चे कार्यक्रमाधिकारी डॉ. संभाजी पाटील, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, जेष्ट नागरीक संघाचे अध्यक्ष डॉ. बी. आर. पाटील, इत्यादी उपस्थित होते.

**सहभागी विद्यार्थी एकूण ७२ मुले : ४० मुली : ३२**

**१३) मौजे वाघोली गावास १० संगणक संच भेट दिले:**

दि. ८ ऑक्टोबर २०२० रोजी शिव छत्रपती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. गोपाळरावजी पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या वतीने मौजे वाघोली, ता. औसा, जि. लातूर या गावाला डॉ. महादेव गव्हाणे यांच्या हस्ते भेट स्वरुप देण्यात आले. मौजे वाघोली गावास राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे दत्तक घेतल्यामुळे सदर गावातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक विकास व्हावे व त्याचबरोबर आधुनिक ज्ञान मिळावे यासाठी महाविद्यालयाकडून सरपंच श्री गोपिचंद लिंबराज पवार, जि.प. शाळेतील मुख्याध्यापक श्री जमीर शेख अहेमदसाब, औसा तालुका शि.स. पतसंस्थेचे चेअरमन श्री. महादेव खिचडे, सेलू बिटचे शि.वि.आ.श्री. राम कापसे साहेब, क.प्र.श्री. बोयने साहेब व गावातील नागरीक यांच्याकडे हे १० संगणक संच सुपूर्द करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. शिवशंकर पटवारी आदी उपस्थित होते.

**१४) दक्षता जनजागृती सप्ताह निमित्त भ्रष्टाचार मुक्तिची सामुहीक शपथ:**

दिनांक २७ ऑक्टोबर २०२० रोजी दक्षता जनजागृती सप्ताह निमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व कार्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी यांना सामुहिकपणे भ्रष्टाचार मुक्तिची शपथ देण्यात आली. "भ्रष्टाचार ही समाज व देशाला लागलेली एक कीड आहे. भ्रष्टाचाराला मिटवण्यासाठी प्रत्येक कर्मचाऱ्यांने कोणत्याही प्रकारे अमिष्याला बळी न पडता प्रामाणिक पणे काम केले पाहिजे. तरच समाज व देशाचे विकास घडुन येईल." असे मत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना व्यक्त केले या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचें प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे,

उपप्राचार्य डॉ. ए . जे. राजू, उपप्राचार्य डॉ. सदाशिव शिंदे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. संभजी पाटील, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, कार्यालयीन प्रबंधक श्री. सतिश चव्हाण, अधिक्षक श्री. जगन्नथ क्षिरसागर इत्यादींनी विशेष प्रयत्न केले. तर मोठ्या संख्येने सामुहिक शपथ ग्रहण साठी प्रध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**सहभागी कर्मचारी एकूण ११८ पुरुष : ८० महिला : ३८**

**१५) राष्ट्रीय एकता दिनानिमित्त स्व. सरदार वल्लभभाई पटेल जयंती व स्व. इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी साजरी :**

दि. ३० ऑक्टोबर २०२० रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रीय एकता दिनानिमित्त भारताचे लोहपुरुष स्व. सरदार वल्लभभाई पटेल जयंती व मा. पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. यावेळी कोविड १९ ची महामारी पसरु नये म्हणून शारीरिक अंतर ठेवत राष्ट्रीय एकतेची शपथ ग्रहण करुन दोन्ही महान विभूतिंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे व प्रातिनिधिक स्वयंसेवक उपस्थित होते.

**१६) दक्षता जनजागृती सप्ताह निमित्त पोष्टर प्रदर्शन:**

दि. ७ नोव्हेंबर २०२० रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागा मार्फत दक्षता जनजागृती सप्ताह निमित्त 'पोष्टर प्रदर्शन' चे आयोजन केले. या वेळी भ्रष्टाचार मुक्त भारत, स्वच्छ भारत या जोखिमा अभिव्यक्तीच्या विचाराचा लढा, विविकांचे हनन, अधंश्रध्दा जबाबदो? इत्यादी विषयावर रासेयोच्या स्वयंसेवकांनी पोष्टर तयार करुन महाविद्यालयीन परिसरात लावुन जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.

यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए. जे. राजू, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, रा. से. यो. चे कार्यक्रमाधिकारी डॉ. के . डी. सावंत, डॉ. संभाजी पाटील , प्रा. विजय गवळी ,प्रा. सोमदेव शिंदे व रासेयो चे स्वयंसेवक पवन कांबळे, जगदाळे गणेश ,विष्णू चव्हाण, श्रध्दा सावंत, इत्यादींनी भ्रष्टाचार मुक्ति व दक्षता जनजागृती पोष्टर प्रदर्शन यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

**सहभागी विद्यार्थी एकूण २४ मुले : १४ मुली : १०**

**१७) प्रजासत्ताक दिन संचलन निवड :**

महाविद्यालयातील बी. ए. तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु. फुलारी रुक्सार हिची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे विद्यापीठाच्या संघात राष्ट्रीय पूर्व प्रजासत्ताक दिन कॅम्पसाठी निवड होवून तीने दि. २० ते २९ नोव्हेंबर २०२० दरम्यान अनुराग विद्यापीठ, हैद्राबाद येथे संपन्न झालेले प्री

एनआरडी कॅम्पमध्ये सहभाग नोंदवला.

**१८) राज्यस्तरीय ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन:**

दिनांक ७ नोव्हेबर २०२० रोजी दक्षता जनजागृती सप्ताह २०२० निमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयामध्ये राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत राज्यभरातून सुमारे ७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवुन विविध विषयांवर आपले विचार व्यक्त केले .

या कार्यक्रमाचे उदघाटन करुन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन करत वक्तृत्व हे व्यक्तिमत्व विकासाचे एक महत्वाचे अंग आहे असे म्हटले आहे. कोरोना सदृश्य परिस्थिती मध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व वक्तृत्व व वादविवाद विभागाव्दारे या ऑनलाईन स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपले विचार व्यक्त करण्यासाठी मंच उपलब्ध करुन दिले कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत तर परीक्षकाचे परिचय डॉ. भीमराम पाटील यांनी व आभार प्रदर्शन प्रा. विजय गवळी यांनी केले या स्पर्धेसाठी परिक्षक म्हणुन प्रा. संदीप जाधाव (पाथरी) व अर्चिता मस्के (पुणे) यांनी केले सदर वक्तृत्व स्पर्धेत १) भ्रष्टाचारमुक्त भारत: स्वप्न की वास्तव २) खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे ३) ऑनलाईन शिक्षण व आजचा विद्यार्थ्यी असे विषय होते.

या स्पर्धेत संजीवणी महाविद्यालय, चापोली येथील स्पर्धक कु. वैष्णवी शिंदे हीने प्रथम क्रमांक प्राप्त केले तर राजर्षी शाहु महाविद्यालय लातूर ची कु. प्रतीक्षा बळीराम मोरे व बी.एम.सी. कॉलेज पुणे येथील स्पर्धक कु. प्रतिक्षा लोकरे यांनी क्रमश: द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केले आणि हाऊगीस्वामी विद्यालय उदगीर चा स्पर्धक चि. चैतन्य जोशी याला उत्तेजनार्थ घेषित केले.

दक्षता जनजागृती सप्ताह निमित्त आयोजित या ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे ,उपप्राचार्य डॉ. ए.जे. अराजु ,उपप्राचार्य डॉ. सदाशिव शिंदे. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत डॉ. संभाजी पाटील डॉ. पुष्पलता त्रिमुखे प्रा. विजय दळवी प्रा. सोमदेव शिंदे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**सहभागी विद्यार्थी एकूण ७० मुले : ४० मुली : ३०**

**१९) शाहू महाविद्यालयात Covid 19 ची Antigen Testing कार्यक्रम:**

दि. २० नोव्हेबर २०२० रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची कोरोना व्हायरस प्रतिबंध व नियंत्रणासाठी Covid 19 ची Rapid Antigen Testing करुन घेण्यात आली. यासाठी महानगरपालिका लातूर चे आरोग्य कर्मचारी याची टीम व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ, ए जे राजू , उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. संभाजी पाटील, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, डॉ. के. डी. सावंत, प्रा.

विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे व महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.

**सहभागी कर्मचारी एकूण २२२ पुरुष : १६२ महिला : ६०**

**२०) प्लास्टिक निर्मूलन जनजागृतीसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम:**

दिनांक १२ डिसेंबर २०२० रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने विद्यार्थ्यामध्ये प्लास्टिक निर्मूलनाबाबत जनजागृती व्हावी यासाठी महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये विशेष व्याख्यानात्मक मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आले या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधीकारी डॉ. के डी. सावंत, डॉ. पुष्पलता त्रिमुखे व प्रा. सोमदेव शिंदे यांनी मार्गदर्शन केले.या प्रसंगी १०० स्वयंसेवक उपस्थित होते. या कार्यक्रमांतर्गत कोविड - १९ चे सर्व नियम पाळून महाविद्यालयातील सर्व स्वयंसेवकांनी लातूर शहरातील मार्केटमधील प्लास्टीक निर्मूलन जनजागृतीसाठी तीन रॅली काढून शहरातील व्यापाऱ्यांना प्लास्टीक वापर टाळून त्यांना पर्यायी व्यवस्था वापरण्यास त्यांना विनंती केली. व त्या संबंधीचे जनजागृतीचे पोस्टर तयार करुन त्याचे वाटप केले.

**सहभागी विद्यार्थी एकूण ११८ मुले : ७२ मुली : ४६**

**२२) सावित्रीबाई फुले जयंती निमित्त सावित्रीच्या लेकी कार्यक्रमाचे आयोजन:**

दि. ०३ जानेवारी २०२१ रोजी प्रसिध्द क्रांतिकारक महिला व भारताची पहिली महिला शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्त दि. ४ जानेवारी २०२१ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे "सावित्रीच्या लेकी" या विषयावर ऑनलाईन कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमात कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, यांनी व कार्यक्रमातील साधन व्यक्ती श्रीमती डॉ. कांचनप्रभा मस्के, श्रीमती डॉ. अनुजा जाधव, डॉ. प्रीती पोहेकर यांनी महिलांच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक व इतर प्रश्नांविषयी मार्गदर्शन करत चर्चा करण्यात आली.

सावित्रीच्या लेकी या ऑनलाईन कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ. ए. जे. राजू, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. संभाजी पाटील, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व रा.से.यो.चे स्वयंसेवक इत्यादी उपस्थित होते.

**सहभागी कर्मचारी / विद्यार्थी एकूण २४८ पुरुष : १९४ महिला : ५४**

**२३) एक दिवसीय राष्ट्रीय कायदे विषयक जनजागृती कार्यक्रमात रा. से. यो. स्वयंसेवकाचा सहभाग:**

दिनांक ११ जानेवारी २०२१ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर येथील लोक प्रशासन

विभाग व राष्ट्रीय महिला आयोग यांच्या संयुक्त विद्यामाने महाविद्यालयात एक दिवसीय राष्ट्रीय कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.या कार्यक्रमात डॉ. पुष्पलता कावळे साईबर क्राईम चे पोलिस निरीक्षक डॉ. गजानन भातलंवडे, जिल्हा पोलिस अधिक्षक श्री निखील पिंगळे व अनेक मान्यवर वक्त्यांनी कायदेविषय मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात महाविद्यालयातील रासयो. स्वयंसेवकांनी व कार्यक्रमाधिकाऱ्यांनी ही सक्रीय सहभाग नोंदवला.

**सहभागी विद्यार्थी एकूण ११२ मुले : ७४ मुली : ३८**

२४) **स्वामी विवेकानंद व मॉ जिजाऊ यांची जयंती साजरी:**

दि. १२ जानेवारी २०२१ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने स्वामी विवेकानंद व मॉ जिजाऊ यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री. एस.बी. मस्के, रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, कॅमेरामेन श्री हरिश बंडगर, सेवक आदी उपस्थित होते.

**सहभागी विद्यार्थी एकूण ९८ मुले : ५० मुली : ४८**

२५) **महाविद्यालयातील प्लास्टिक निर्मुलन जनजागृती अभियान:**

दि.१८ जानेवारी २०२१ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने लातूर शहरातील गाव भागात रासेयोच्या स्वयंसेवाकांनी व कार्यक्रमाधिकाऱ्यांनी प्लास्टिक वापरासंबधी व त्याचे योग्य निर्मुलण करण्याबाबत लोकांमध्ये जागृती करण्यात आली. बाजार परिसरात प्लस्टिक निर्मुलना संबंधी घेषवाक्याचे विविध पोस्टरस लावण्यात आले स्वयंसेवकांनी घरोघरी जाऊन प्लास्टिक वापराबाबत लोकांचे मार्गदर्शन केले. सुमारे ५० विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला या उपक्रमाच्या यशस्वीतेने साठी कार्यक्रमाधिकारी डॉ. के. डी. सावंत, डॉ. संभाजी पाटील, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. व्ही विजय गवळी, कु. गायत्री ढेकरे, विष्णु चव्हाण, पवन कांबळे, मोरे प्रतिक्षा व इतर स्वयंसेवकांनी विशेष प्रयत्न केले.

**सहभागी विद्यार्थी एकूण १०२ मुले : ६८ मुली : ३४**

२६) **राष्ट्रीय मतदार दिवसा निमित्त शाहू महाविद्यालयात सामहिक शपथ:**

दि. २५ जानेवारी २०२१ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व राज्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने भारतीय निवडणूक आयोगाच्या ११ व्या राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कर्तव्यदक्ष राहून मतदान करण्यासाठी मतदान जनजागृतीची सामुहिक शपथ देण्यात आली. यावेळी उपस्थितांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी मार्गदर्शन केले. व ‘मतदारच देशाचे भविष्य घडवू शकतो.’ असे

म्हणाले.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य डॉ. ए.जे. राजू, उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, डॉ. ओ.व्ही. शहापूरकर, प्रा. विकास वाघमारे, प्रा. ज्ञानेश्वर बनसोडे, प्रा. सुदर्शन पाटील, प्रबंधक सतिश चव्हाण, कार्यालय अधिक्षक श्री जगन्नाथ क्षीरसागर, ग्रंथपाल डॉ. एस.बी. मस्के व महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सहभागी कर्मचारी एकूण १३२ पुरुष : ८८ महिला : ४४**

**२७) प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण:**

दिनांक २८ जानेवारी २०२१ रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने महाविद्यालयाच्या शेजारील मुख्य रसत्यांच्या कडेला पिंपळ , लिंब, बकुळ इत्यादी १५ वृक्षाचे रोपन करण्यात आले व त्यांना संरक्षण जाळया लावण्यात आल्या.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, उपप्राचार्य ऐ.जे. राजू, उपप्राचार्य डॉ. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. के. डी. सावंत, डॉ. संभाजी पाटील, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. श्रिनिवास मोरे, प्रा. सुदर्शन पाटील, प्रा. नानासाहेब काळे, प्रा. बनसोडे, प्रा. नितीन पांचाळ, ग्रंथपाल डॉ. एस.बी. मस्के, रा.से.यो. विद्यार्थी स्वयंमसेवक विष्णु चव्हाण, निलेश चलमले व इतर स्वयंमसेवक उपस्थित होते.

**सहभागी विद्यार्थी एकूण ४२ मुले : ३० मुली : १२**

**२८) शिव जयंतीनिमित्त राजर्षी शाहू महाविद्यालयात रक्तदान शिबीर संपन्न:**

दि. १६ फेब्रुवारी २०२१ रोजी छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिजन्मोत्सव समिती लातूर व राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंती २०२१ च्या उपलक्ष्याने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले. या रक्तदान शिबीराचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी केले. सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज व मॉ जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पार्पण करुन त्यांना अभिवादन करण्यात आले. या रक्तदान शिबीरात एकूण ४२ स्वयंसेवकांनी स्वेच्छेने रक्तदान केले. शिबीरात उद्‌घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी शिवजयंती समितीचे अध्यक्ष डॉ. हर्षवर्धन राऊत, प्रमुख पाहुणे अभिजीत भैय्या देशमुख, डॉ. अभय कदम डॉ. संतोष देशमुख, डॉ. संजय पौळ, प्रा सुनिल नावाडे, राष्ट्रीय सेवा

योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, प्रा. वाय.बी. शिखरे, प्रा. श्रिनिवास मोरे, श्री डी.एस. पाटील, श्री पृथ्वीराज पवार, श्री दत्ता मोटे, केदार पाटील, डॉ. योगेश शिंदे, श्री ऋषिकेश भराडे, श्री भीमराव दुनगावे, श्री आशिष काटे, अर्बण ब्लड बँकेचे तंत्रज्ञ श्री संदीपान ढोपरे इ. उपस्थित राहून रक्तदान शिबीराच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

**सहभागी विद्यार्थी एकूण ४२ मुले : ३२ मुली : १०**

२९) **छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त आयोजित वृक्षदिंडीत रासेयो स्वयंसेवकांचा सहभाग:**

दि. १८ फेब्रुवारी २०२१ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सह्याद्री देवराई व लातूरातील सामाजिक संस्थांच्या वतीने पर्यावरणपूरक संदेश देणारी वृक्षदिंडी काढण्यात आली. या दिंडीमध्ये राजर्षी शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व एनसीसी विभागाच्या स्वयंसेवकांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदविला.

पर्यावरणाचा समतोल राखुया... वृक्षांचे सवंवर्धन करुया... असे संदेश देणारे फलक व वृक्ष हातात घेऊनवडाच्या नावानं चांगभलं, पिंपळाच्या नावानं चांगभलं, उंबराच्या नावानं चांगभलं अशा घोषणा देत सुरुवातीला एक मोठे वडाचे झाड लावून दिंडीची सुरूवात झाली. निसर्गाप्रति संवेदनशिलता निर्माण व्हावी, आपण एक पर्यावरणासाठी जागरुक संवेदनशील नागरिक बनावे असे आवाहन यावेळी करण्यात आले. या वृक्ष दिंडीत सह्याद्री देवराई, लातूर वृक्ष, मराठा सेवा संघ, शाहू महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व एनसीसी विभाग, केशवराज विद्यालय, व वसुंधरा प्रतिष्ठान ग्रीन व ट्री फाऊंडेशन, ज्येष्ठ नागरीक संस्था इत्यादींचा सहभाग होता. यावेळी सुपर्ण जगताप, प्रा. सुनिल नावाडे, जितेश चापसी, नगरसेविका रागिणी यादव, डॉ. बी.आर. पाटील, ॲड. सचिन काळे, मुख्याध्यापक संजय विभूते, कार्यक्रमाधिकारी प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, आम्रपाली सुरवसे, धीरज तिवारी, अनिता देशपांडे, पृथ्वीराज पवार, विवेक सौताडेकर, डॉ. नेताजी शिंगटे इत्यादीसह रासेयो स्वयंसेवक व एनसीसी कॅडेट उपस्थित होते.

**सहभागी विद्यार्थी एकूण १०८ मुले : ८० मुली : २८**

३०) **शाहू महाविद्यालयात शिवजयंती साजरी:**

दिनांक १९ फेब्रूरवारी २०२१ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय व ग्रंथालय विभाग यांच्या सयुक्त विद्यामाने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी उपस्थितांना विशेष मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ऐ.जे. राजु, डॉ. उपप्राचार्य सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधीकारी डॉ. के.डी. सावंत, डॉ. संभाजी पाटील, डॉ. पुष्पलता त्रिमुखे, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, डॉ.

ओ. व्ही. शहापुरकर, डॉ. दिपक वेदपाठक, प्रा. विजय दळवी, प्रा. नानासाहेब काळे, ग्रंथपाल प्रा. एस. बी मस्के, डॉ. कांचनप्रभा मस्के, प्रा. श्रिनिवास मोरे, सेवक श्री गोंविद जाधव व महाविद्यालयाचे अनेक प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

**सहभागी विद्यार्थी एकूण १२२ मुले : ८२ मुली : ३२**

**३१) संत गाडगेबाबा यांची जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम:**

दि. २३ फेब्रुवारी २०२१ रोजी राजर्षी शाहू महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने राष्ट्रसंत गाडगेबाबा यांची जयंती साजरा करण्यात अली. यावेळी गाडगेबाबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. भीमराव पाटील यांनी गाडगेबाबांच्या जीवनावर प्रकाश टाकणारे मार्गदर्शन पर विचार व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्रबंधक श्री सतिश चव्हाण, कार्यालय अधिक्षक श्री जगन्नाथ क्षीरसागर, ग्रंथपाल श्री एस.बी. मस्के, रासेयो कार्यक्रमाधिकारी श्री विजय गवळी, प्रा. व्ही.ए. झरीटाकळीकर, प्रा. एस. एन. शिंदे, प्रा. खंदाडे, प्रा. ए.आर. गालफाडे, सेवक श्री चंद्रकांत तिडके, रामलिंग स्वामी, ग्रंथालयाचे कर्मचारी श्री शेख व इतर उपस्थित होते.

**सहभागी विद्यार्थी एकूण ४८ मुले : ३२ मुली : १६**

**३२) जागतिक महिला दिनानिमित्त प्राध्यापकांसाठी पोस्टर मेकिंग स्पर्धा संपन्न:**

दि. ८ मार्च २०२१ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकांसाठी ‘पोस्टर मेकिंग’ स्पर्धा घेण्यात आली. सदर पोस्टर मेकिंग स्पर्धेत वरिष्ठ महाविद्यालय गटातून प्रा. प्रशांत जोशी प्रथम तर प्रा. मंजूषा शिंदे व प्रा. धनश्री जगताप या दोघी द्वितीय आणि डॉ. ओमप्रकाश शहापूरकर यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. कनिष्ठ महाविद्यालय गटातून प्रा. प्रशांत लामतूरे यांनी प्रथम तर प्रा. युवराज शिखरे व प्रा. श्रीनिवास मोरे यांनी क्रमशः द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केले. उत्तेजनार्थ क्रमांक प्रा. दता नल्ले, प्रा. सी.व्ही. कुलकर्णी, प्रा. द.बा. सोनकांबळे यांनी पटकावले. या पोस्टर स्पर्धेचे उद्घाटन ॲड. वैशाली लोंढे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांच्या उपस्थितीत केले. यावेळी ॲड वैशाली लोंढे व प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी उपस्थितांना अनमोल मार्गदर्शन केले.

या स्पर्धेत महाविद्यालयातील एकूण ७५ प्राध्यापक, शिक्षकांनी महिलांच्या प्रश्नांसंदर्भात जनजागृतीपर पोस्टर तयार करुन सक्रीय सहभाग नोंदवला. उद्घाटनानंतर क्रांतिकारी बदल घडवणाऱ्या महिला सावित्रीबाई फुले व मा जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले व महाविद्यालयीन महिला प्राध्यापिकांना राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने गुलाब पुष्प देऊन त्यांचा

सन्मान करण्यात आला. या स्पर्धेला यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे व रासेयोच्या स्वयंसेवकांनी विशेष प्रयत्न केले.

**सहभागी कर्मचारी एकूण ७५ पुरुष : ४० महिला : २५**

Principal
Rajarshi Shahu Mahavidyalaya,
LATUR

**कार्यक्रमाधिकारी** **प्राचार्य**

# Rajarshi Shahu Mahavidyalaya (Autonomous), Latur



Tree Plantation programe at MIDC Latur on 12.01.2021



Poster presentation on Anti Corruption on 07.11.2020



Filiations of Vice-Principal Prof. S.N. Shinde




Blood Donation on 16.02.2021




Rally for Plastic Eradication on 12.12.2020




Poster presentation competition on women empowerment on 08.03.2021



Voters awareness programme on 25.01.2021




Tree Plantation programme on 28.01.2021 on occasion of birthday of honorable Dr.M.H. Gavhane



Oth given to be Teaching and Nonteaching staff vegillance awarness week






Felicitation of Miss Ruksar Fulari for selection in pree NRD camp at Hyadrabad







Tree Plantation




Awarness about plastic eradication




Online Programme Savitrichya Leki

▶दक्षता जनजागृती सप्ताह ▶कार्यालयीन कर्मचाऱ्यांचा समावेश

# शाहू महाविद्यालयात भ्रष्टाचार निर्मुलनाची शपथ



लातूर : प्रतिनिधी

येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सतर्क भारत समृध्द भारत ही संकल्पना घेऊन केंद्र सरकार पुरस्कृत दक्षता जनजागृती सप्ताहाच्या निमित्ताने दि. २७ ऑक्टोबर २०२० रोजी महाविद्यालयातील सर्व कार्यालयीन कर्मचाऱ्यांना प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ दिली.

भ्रष्टाचार समाजाच्या विकासामधील मोठा अडथळा आहे. हा अडथळा दूर होण्यासाठी सर्वांनी मिळून सतर्क होण्याची गरज आहे. सक्षम भारतासाठी नागरिकांनी दक्ष राहण्याची गरज आहे, असे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे यांनी यावेळी प्रतिपादन केले. या वेळी उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे यांनी ही समयोचित भाषण केले.

राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या प्रांगणात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. ए.जे. राजू, उपप्राचार्य डॉ. सदाशिव शिंदे, कार्यालय प्रबंधक श्री. सतीश चव्हाण, कार्यालय अधीक्षक जगन्नाथ क्षीरसागर, रासेयोचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. संभाजी पाटील, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, डॉ. स्वाती फेरे, श्री. गोविंद जाधव शिक्षक व कार्यालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कल्याण सावंत यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. संभाजी पाटील यांनी मानले.

**लोकमत**

# शिवजयंतीनिमित्त वृक्षदिंडी

लोकमत न्यूज नेटवर्क

**लातूर** : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सह्याद्री देवराई व लातुरातील सामाजिक संस्थांच्या वतीने पर्यावरणपूरक संदेश देणारी वृक्षदिंडी काढण्यात आली होती. या दिंडीमध्ये शहरातील विविध शाळा, महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला.



पर्यावरणाचा समतोल राखुया... वृक्षांचे संवर्धन करुया... असे संदेश देणारे फलक विद्यार्थ्यांच्या हाती होते. निसर्गाप्रती संवेदनशीलता निर्माण व्हावी, आपण एक पर्यावरणासाठी जागरुक, संवेदनशील बनावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

या दिंडीत सह्याद्री देवराई, लातूर वृक्ष, मराठा सेवा संघ, शाहू महाविद्यालय, केशवराज विद्यालय, वृक्ष प्रतिष्ठान, वसुंधरा प्रतिष्ठान, ग्रीन फाऊंडेशन, ट्री फाऊंडेशन, ज्येष्ठ नागरिक संघ आदींनी सहभाग नोंदविला.

यावेळी सुपर्ण जगताप, प्रा. सुनील नावाडे, जितेश चापसी, नगरसेविका रागिणी यादव, डॉ. बी. आर. पाटील, ॲड. सचिन काळे, मुख्याध्यापक संजय विभूते, महेश कस्तुरे, प्रशांत दूधमांडे, प्रतिभाताई गोमसाळे, डॉ. अभय कदम, प्रा. विजय गवळी, प्रा. सोमदेव शिंदे, आम्रपाली सुरवसे, धीरज तिवारी, अनिता देशपांडे, पृथ्वीराज पवार, विवेक सौताडेकर, डॉ. नेताजी शिंगटे, हेमंत रामढवे, सोमनाथ सुरवसे, खंडेराव गंगणे, अमर साळुंके, अमरदीप गुंजोटे, विष्णू चव्हाण, चंद्रकांत शिंदे, राणा चव्हाण, प्रसाद पाटील, वसुंधरा गर्जे, दिगंबर वेदपाठक, बालाजी चामे, महेश सुरवसे, सौरव गुरव आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

Hello Latur
Page No. 2 Feb 19, 2021
Powered by: erelego.com

लातूर
पुरोगामी विचाराचे एकमत Next
लातूर, शनिवार, दिनांक १३ मार्च २०२१
३ epaper : http://www.dainikekmat.com/epaper

**क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन**

[illegible]



# शाहू महाविद्यालयात पोस्टर स्पर्धा

**लातूर : प्रतिनिधी**

राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. ०८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त महाविद्यालयीन प्राध्यापक व शिक्षकांसाठी घेतलेल्या 'पोस्टर मेकींग स्पर्धेत' वरिष्ठ महाविद्यालय गटातून प्रा. प्रशांत जोशी प्रथम तर प्रा. मंजुषा शिंदे, प्रा. धनश्री जगताप या द्वितीय आणि डॉ. ओमप्रकाश शहापूरकर यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला. कनिष्ठ महाविद्यालय गटातून प्रा. प्रशांत लामतुरे यांनी प्रथम तर प्रा. युवराज शिखरे व प्रा. श्रीनिवास मोरे यांनी क्रमशः द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केला. उत्तेजनार्थ क्रमांक प्रा. दत्ता नल्ले, प्रा. सी. व्ही. कुलकर्णी, प्रा. द. वा. सोनकांबळे यांनी पटकाविले. या स्पर्धेला यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. कल्याण सावंत, डॉ. संभाजी पाटील, प्रा. विनय अशोक गवळी, प्रा. सोमदेव शिंदे व रासेयोच्या स्वयंसेवकांनी विशेष प्रयत्न केले.

Lokmat Times

# Shahu College staff take Integrity Pledge

## Various outreach activities being held as part of Vigilance Awareness Week

**LOKMAT NEWS NETWORK**
**LATUR, OCT 28**

Rajarshi Shahu Mahavidyalaya and its National Service Scheme (NSS) unit are observing the Vigilance Awareness Week from October 27 to November 2 with the theme 'Vigilant India, Prosperous India.'

Various outreach activities are being organised during the week for dissemination of anti-corruption message and stressing the necessity of vigilant India as essential for a prosperous India.

Integrity Pledge was taken on the first day of the awareness week.

Principal Mahadev Gavhane, who administered the oath to all staff members, said, "Corruption is a major obstacle in the development of society. We all together should be vigilant to overcome this obstacle. Citizens need to be vigilant about their duties for making India competent and prosperous."

Aurangabad First
Page No. 4 Oct 29, 2020
Powered by: erelego.com